# बाप्तिस्मा करणाूया योहानाने येशूचा बाप्तिस्मा केला

**प्रार्थना :**''प्रिय प्रभु, तू एकच देव आहेस आणि तीन व्यक्ती ही आहेस, यालाच विश्वासणारे पवित्र त्रैक्यत्व असे महणतात, हे मुलांना समजण्यासाठी कृपा करुन ह्या अभ्यासाचा उपयोग करुन घे''.

मुलांचे वय आणि गरजांना अनुरूप अशे शैक्षणिक कार्यक्रम निवडा;.

**मत्तय 3:1-17** मधून येशूच्या बाप्तिस्म्याचा कथा वृत्तांत मोठया मुलाने वा शिक्षकाने वाचून दाखवावा किंवा सांगावा.

**स्पष्ट करा :**

- येशूच्या बाप्तिस्म्याने त्रैक्यत्वातील तीन व्यक्ती एकत्रितपणे काम करतात हे दाखवले.
- तीन व्यक्ती म्हणजे एक देव असून एकच म्हणून कार्य करतात, तीन व्यक्ती म्हणजे तीन देव नव्हेत.
- एकाच देवामध्ये तीन व्यक्ती हे सत्य म्हणजे एक अद्‌भुत रहस्य आहे आणि ते फक्त देवालाच समजते.



पुढील **प्रश्न** विचारा ***( प्रत्येक प्रश्नानंतर उत्तर दिलेले आहे )***

- योहान कोणासाठी मार्ग तयार करीत होता? *(पाहा वचन 3)*
- योहानने बाप्तिस्मा केल्यावर लोक काय करीत? *(ते आपली पातके कबूल करीत, वचन 6)*
- योहानाने आपली पातके कबूल न करणाूया धार्मिक लोकांना कोणता इशारा दिला? *(वचन 8)*
- येशू पश्चाताप करणाूया लोकांचा बाप्तिस्मा कशाने करणार आहे? *(पवित्र आत्म्याने, वचन 12)*
- येशूने बाप्तिस्मा करण्यास का सांगितले? *(पातक्यांसाठीचा आदर्श म्हणून योग्य ते करणे आवश्यक होते, वचन 15)*
- बाप्तिस्म्याच्या वेळी त्रैक्यत्वातील प्रत्येक व्यक्ती कशा प्रकारे प्रकट झाली *(पुत्राचा बाप्तिस्मा झाला, त्याच्यावर पवित्र आत्मा उतरला आणि पित्याची आकाशातून वाणी झाली, वचने 16-17)*

**नाट्यीकरण करा** येशूच्या बाप्तिस्म्याच्या वेळी त्रैक्यत्वाने कशा प्रकारे कार्य केले *(मत्तय 3:1-7)*

- उपासनेच्या पुढ्रायाशी चर्चा करुन मुलांना नाटिका सादर करण्यासाठी व्यवस्था करा.
- मुलांकडून नाटिकेची चांगली तयारी करुन ह्या.
- तुम्ही सर्वच भूमिका केल्या पाहिजेत असे नाही.

- मोठया मुलांनी लहान मुलांकडून तयारी करुन घेण्यास मदत करावी.
- मोठया मुलांनी किंवा प्रौढांनी **बाप्तिस्मा करणारा योहान, येशू** आणि **निवेदक** ह्या भूमिका कराव्यात.
- लहान मुलांनी **बघणारे लोक, परुशी व सदूकी** ह्या भूमिका कराव्यात.

**निवेदकः** मत्तय 3:1-12 मधून कथा वृत्तांताचा पहिला भाग सांगून म्हणा, ''बाप्तिस्मा करणारा योहान काय म्हाणतो ते ऐका.

**योहानाः** मोठयाने म्हणा, ''प्रभूच्या येण्याची तयारी करा. आपल्या पापांचा पश्चात्ताप करा''.

**बघणारे लोकः** ''मी माझी पातके कबूल करतो,'' ''कृपा करुन मला बाप्तिस्मा द्या.''

**परुशीः**

**सदूकीः** ''मी, सदूकी, किती चांगला आहे हे दाखवण्यासाठी मी बाप्तिस्मा घेईन. पश्चात्ताप करण्याची मला गरजच काय!''

**योहानाः** मोठयाने म्हणा, ''तुम्ही परुशी साप आहात! आपली मने बदला! लवकरच एकजण येणार आहे, तो तुमचा बाप्तिस्मा पवित्र आत्म्याने करील. देवाच्या आज्ञा पाळा नाहीतर तुम्हांला न्यायाच्या अग्नीचा सामना करावा लागेल.''

**निवेदकः** मत्तय 3:13-17 मधून कथा-वृत्तांताचा दुसरा भाग सांगून म्हणा, ''येशू बाप्तिस्मा करणाया योहानाला काय सांगतो ते ऐका''.

**येशूः** ''तू माझा बाप्तिस्मा केलाच पाहिजेस''.

**योहानः** ''पण येशू, मी तसे करण्यास पात्र नाही. खरे म्हणजे तूच माझा बाप्तिस्मा केला पाहिजेस!''

**येशूः** ''योग्य ते करणे आवश्यकच आहे, मी पातक्यां साठी एक आदर्श असा असलो पाहिजे''.

**योहान :** येशूचा बाप्तिस्मा करीत असल्याचा अभिनय करा. मग वर बोट करुन म्हणा. ''पाहा! आकाश उघडले अणि पवित्र आत्मा कबुतरा-सारखा येशूवर येत आहे''.

**बघणारे लोकः** वर बोट करुन ओरडा, ''ए ऐका!'' मग म्हणा, ''वरुन स्वर्गातून आकाशवाणी होत आहे!''

**योहान :** ''देव पित्याने आकाशातून येशू विषयी काय सांगितले ते ऐकले ना तुम्ही? त्याने म्हटले, हा माझा पुत्र मला परमप्रिय आहे. देव आमच्याशी बोलला!''

**निवेदकः** नाटिकेसाठी मदत करणाया प्रत्येकाचे आभार माना.

**प्रश्न :**मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर वर दिलेले प्रश्न त्यानी प्रौढांना विचारावेत.

**विचारा :** त्रैक्यत्वामधील व्यक्ति एकच देव असल्याने आणखी कोणत्या मार्गांनी एकत्रितपणे कार्य करतात, याची उदाहरणे सांगा (मुलांनी त्यांना येत असतील तर उदाहरणे सांगावीत. उदाहरणांमध्ये निर्मिती, येशूचे पुनरुत्थान आणि आमचे तारण याचा समावेश असावा)

**पाठ करा :** लूक 9:35 ''तेंव्हा मेघांतून अशी वाणी झाली की, 'हा माझा पुत्र, माझा निवडलेला आहे, ह्याचे तुम्ही ऐका!''

**कविता :** स्तोत्र 2:7,8,10 व 11 ही वचने चार मुलांना प्रत्येकी एक अशी म्हणण्यास सांगा.




मुलांना, आकाशातून खाली उतरणाया कबुतराचे चित्र काढण्यास सांगा. त्यांनी ते उपासनेच्या वेळी मोठया माणसांना दाखवून, आम्ही येशूच्या नावात आमची आमच्या पातकांपासून सुटका कर अशी देवपित्याकडे विनंती करतो

तेव्हा येशू पवित्र आत्म्याने आमचा बाप्तिस्मा करतो हे चित्रावरुन स्पष्ट होते असे सांगा.

मोठया मुलांना हवे असल्यास, त्यांना पुढे दिलेला त्रैक्यत्वाच्या व्यक्तीचा तक्ता काढायला सांगा.

येशूचा बाप्तिस्मा किंवा त्रैक्यत्व यावर मोठया मुलांनी गीत अथवा कविता लिहावी.




**प्रार्थना :** ''पवित्र देवा, तू एकच खरा देव आहेस. तू तिघांमध्ये, पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा, एकच आहेस याबद्यल आम्ही तुझी स्तुती करतो. आम्हांला हे समजत नाही पण आमचा। तुझ्यावर भरंवसा-विश्वास आहे. आम्हांला तुझी मुले होता यावे यासाठी तू येशूच्या जीवनात आपल्या आत्म्याने आमचा बाप्तिस्मा केलास याबद्दल तुझे आभार मानजतो.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net